अर्ज दाखल तारीख : १५—१२—२०१७
अर्ज नोंदणी तारीख : ०१—०१—२०१८
अर्ज निकाल तारीख : १३—०७—२०१८
कालावधी :वर्ष — महिने — दिवस
०० — ०६ — १३

## ४थे सहदिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), वर्धा यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी श्रीमती पि.व्ही.राणे)

**हिंदु विवाह अर्ज क्र.१/२०१८** **नि. क्र.**
**(CNR:MHWR02-001380-2017)**

१) सौ.प्रांजली अतुल उगेमुगे
वय २० वर्ष, कामधंदा — घरकाम
रा.द्वारा श्री रामभाउ पिंपळे
राहणार इंदीरानगर वार्ड क्र.१ साई
मंदीरजवळ, आर्वी नाका, वर्धा
तह.जि.वर्धा

२) अतुल नारायणराव उगेमुगे
वय २५ वर्ष, कामधंदा— खाजगी नोकरी,
रा. वेळा (बेला), तालुका
हिंगणघाट जि.वर्धा

.. **अर्जदार**

**विरूध्द**

निरंक .. **उत्तरवादी**

## हिंदु विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे परस्पर संमतीने घटस्फोट मिळणेसाठी अर्ज.

==================================
अर्जदार क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ श्री आर.ए.बोबडे
==================================

## **न्या य नि र्ण य**

( पारीत दिनांक १३ जुलै, २०१८ )

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे एकमेकांच्या संमतीने घटस्फोट मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारांचे कथनानुसार त्यांचा विवाह दिनांक २६.११.२०१६ रोजी वर्धा येथे जातीरिवाजानुसार संपन्न झाला. दोन्ही पक्षास हिंदू विवाह कायदा लागू होतो. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ च्या राहत्या घरी वेळा (वेला) तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा येथे नांदावयास गेली. विवाहाच्या काही दिवसानंतरच अर्जदार क्र.१ व २ यांच्यात शुल्लक कारणावरून वाद होण्यास सुरूवात झाली. विवाहाच्या सुरवातीपासुन त्यांचे स्वभाव व विचार एकमेकांपेक्षा वेगळे व न जुळणारे असल्याने त्यांच्यात नेहमीच वादविवाद होवु लागले आणि त्यांच्यातील वाद विकोपाला जावुन त्यांना एकमेंकासोबत नांदणे अशक्य झाले. त्यांचे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ पासुन विभक्त होवुन दि.११.१२.२०१६ पासुन वेगळी तिचे माहेरी राहत आहे. दरम्यानच्या कालावधीत त्यांच्यात कोणताही समेट घडुन आला नाही.

**३.** दोन्ही अर्जदारांचे कथन आहे की, त्यांच्यातील मतभेद न मिटल्याने ते एकत्र नांदू शकत नाहीत या निष्कर्षाप्रत आले. म्हणुन त्यांनी काही अटी व शर्तीवर एकमेकांच्या संमतीने त्यांच्यातील विवाहसंबंध संपुष्टात आणण्याचे ठरविले आहे. म्हणुन प्रस्तुत अर्ज त्यांनी दाखल केला.

**४.** दि.११.१२.२०१६ पासून अर्जदार क्र.१ व २ विभक्त राहात

असून तेव्हापासून त्यांच्यामध्ये पती—पत्नी या नात्याने संबंध आलेले नाहीत. त्यांच्यामध्ये भविष्यात एकत्र राहणे व नांदणे अशक्य असल्याची त्यांना खात्री झाल्याने त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**५.** अर्जातील कथनांचा विचार करता न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदरच्या मुद्दयांवरील माझे निष्कर्ष मी दिलेल्या कारणमीमांसेसहित खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे ते परस्पर संमतीने घटस्फोट मिळण्यास पात्र आहेत का ? | **होकारार्थी.** |
| २) | आदेश व हुकूमनामा कोणता ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता:</u>**

**६.** अर्जातील त्यांच्या कथनांच्या समर्थनार्थ अर्जदारांनी अनुक्रमे नि.५ व नि.६ अन्वये त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे. दिनांक ९.७.१८ रोजी अर्जदार व त्यांचे विद्‌वान वकील न्यायालयासमोर हजर होते. त्यांनी त्यांच्या शपथपत्रातील मजकूर व त्यावरील त्यांच्या सहया मान्य केल्या आहेत. दरम्यानच्या काळात प्रकरण काढून घेण्यात आलेले नाही. अर्जदारांचे शपथपत्रांवरून त्यांच्यामध्ये सलोखा निर्माण होण्याची व लग्नसंबंध कायम ठेवण्याची शक्यता राहिली नसल्याचे दिसून येते.

**७.** अर्जदारांचे कथन व शपथपत्रे यावरून असे दिसून येते की, अर्जदारांचा विवाह हिंदु धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झालेला असून अर्जदार प्रस्तुतचा अर्ज दाखल दिनांक १५.१२.२०१७ पुर्वी एक वर्षापासुन म्हणजे दि. ११.१२.२०१६ पासुन विभक्त राहात आहेत. तेव्हापासुन अर्जदार

क्रमांक १ व २ त्यांच्यात वैवाहीक संबंध आले नाही व आज रोजी अर्जदार क्र.१, अर्जदार क्र.२ पासुन गरोदर नाही.

८. अर्जदारांमध्ये ठरलेल्या अटी व शर्तीनुसार अर्जदार क्र.१ हिला अर्जदार क्र.२ ने एकमुस्त खावटीपोटी रूपये १,१०,०००/—दिले आहेत. तसेच लग्नातील सोन्याचे दागदागीने व इतर भेटवस्तु तिला परत दिल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यात कोणतेही देणेघेणे राहीलेले नाही. अर्जदार क्र.१ ने तिला रक्कम रूपये १,१००००/— व सोन्याचे दागीने व भेटवस्तु मिळाल्याचे मान्य केले आहे. त्यानुसार तिने तिचा भविष्यातील खावटीचा अधिकार सोडुन दिला आहे आणि भविष्यात ते एकमेकांच्या संपत्तीवर हक्क सांगणार नाही आणि स्वत:च्या मर्जीने दुसरा विवाह करण्याचा एकमेकांना आडकाठी करणार नाही असे त्यांच्यात ठरल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी त्यांचे शपथपत्रातील इतर अटी व शर्ती देखील मान्य व कबूल केल्या आहेत.

९. यावरून प्रस्तुत अर्जातील कथने खरी व बरोबर असल्याचे दिसून येते. अर्जदारांनी हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम २३ मधील सर्व तरतुदी पुर्ण केल्याचे दिसून येते. दोन्हीही अर्जदारांनी त्यांना घटस्फोट मिळण्यासाठी मुक्त संमती दिल्याचे दिसून येते. तसेच याकामी सादर झालेला पुरावा व मुद्दा क्र.१ वर मी दिलेली कारणे यावरुन अर्जदार घटस्फोट मिळणेस पात्र आहेत असा निष्कर्ष मी काढते व त्याचे उत्तर होकारार्थी देते व खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ सौ.प्रांजली अतुल उगेमुगे व अर्जदार क्र.२ अतुल

नारायणराव उगेमुगे यांचा दिनांक २६.११.२०१६ रोजीचा विवाह आजपासून विच्छेदीत करण्यात येत आहे.

३) अर्जदारांनी आपापला खर्च स्वत: सोसावा.

४) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(श्रीमती पि.व्ही.राणे)
दिनांक: १३/०७/२०१८ ४थे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वर्धा.